0 2 OCT 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# इतिहास हा भविष्याला दिशा देणारा स्त्रोत

## डॉ. साळुंखे : विद्यापीठात 'गाथा आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची' ग्रंथाचे प्रकाशन

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १ : ''इतिहासाचे रोमँटिकरण न करता तो वास्तववादी असणे आवश्यक आहे. कारण, इतिहास हा भूतकाळाचा केवळ संग्रह नसून भविष्याला दिशा देणारा स्त्रोत आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी आज येथे केले.''**

विद्यापीठात महात्मा गांधी जयंतीच्या पूर्वसंध्येला 'गाथा आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची' या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. राजर्षी शाहू सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वारणा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. अरुण भोसले, गोवा मुक्ती संग्रामातील ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक वसंतराव माने प्रमुख उपस्थित होते. विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग, जनसंपर्क कक्ष आणि कला व साहित्य मंडळ यांच्यातर्फे कार्यक्रम घेण्यात आला.

डॉ. साळुंखे म्हणाले, ''सत्य, अहिंसा, स्वराज्य, शिक्षण, संविधान आणि राष्ट्रप्रेम यांसारखी मूल्ये स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्या कृतीतून समाजासमोर ठेवली. त्यामुळे त्यांचा इतिहास नव्या पिढीला केवळ भूतकाळाची माहिती देणारा न राहता वर्तमानातील मूल्यजाणीव आणि भविष्याची दिशा देणारा ठरला पाहिजे. 'गाथा आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची' हा ग्रंथ देशाच्या आत्म्याशी संवाद साधणारा तसेच भावी पिढीच्या चारित्र्यनिर्मितीचा दीपस्तंभ ठरणारा आहे.''

'गाथा आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची' या ग्रंथाच्या माध्यमातून ज्ञात-अज्ञात, नायक ठरलेल्या सामान्य स्वातंत्र्यसैनिकांच्या संघर्षाचे दस्तावेजीकरण झाले आहे. त्यांच्या मनोगतांना शब्द,




शिवाजी विद्यापीठ : 'गाथा आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची' या ग्रंथाचे प्रकाशन करताना माजी कुलगुरु डॉ. माणिकराव साळुंखे. यावेळी शेजारी डावीकडून अवनीश पाटील, अरुण भोसले, डी. टी. शिर्के, व्ही. एन. शिंदे, दत्तात्रय मचाले आदी.

त्यांच्या कार्याला इतिहासात स्थान मिळाले असल्याचे डॉ. भोसले यांनी सांगितले.

देशाला मिळालेले स्वातंत्र्य सहज, सोपे किंवा स्वस्तात मिळालेले नाही. त्यामागे असंख्य स्वातंत्र्यसैनिकांचे त्याग, समर्पण आणि बलिदान आहे, याची जाणीव नव्या पिढीला करून देणे आवश्यक आहे, असे डॉ. शिर्के यांनी सांगितले.

धीरज शिंदे, भरतभूषण माळी, अजितकुमार जाधव, विलास पवार, राहुल रेपे, आलोक जत्राटकर, सुस्मिता खुटाळे यांचा सत्कार करण्यात आला. इस्माइल पठाण, रणधीर शिंदे, नंदकुमार मोरे, भारती पाटील, नीलांबरी जगताप, डी. जी. भास्कर, दत्तात्रय मचाले आदी उपस्थित होते. इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

02 OCT 2026

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### डॉ. माणिकराव साळुंखे : शिवाजी विद्यापीठात 'गाथा आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची' ग्रंथाचे प्रकाशन

# स्वातंत्र्यसैनिकांनी नैतिक मूल्ये देशासमोर ठेवली

**स्वातंत्र्य चळवळ ही नैतिक मुल्यांची क्रांती होती. सत्य, अहिंसा, स्वराज्य, शिक्षण, संविधान व राष्ट्रप्रेम आदी मूल्ये स्वातंत्र्यसैनिकांनी देशासमोर ठेवली. त्यामुळे त्यांचा इतिहास नव्या पिढीला केवळ भूतकाळाची माहिती देणारा न राहता वर्तमानातील मूल्यजाणीव व भविष्याची दिशा देणारा ठरला पाहिजे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी केले.**



कोल्हापूर : 'गाथा आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची' या ग्रंथाचे प्रकाशन करताना डॉ. माणिकराव साळुंखे सोबत वारणा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, डॉ. विलास शिंदे, डॉ. अवनीश पाटील, डॉ. अरूण भोसले, डॉ. दत्तात्रय मचाले.

त. भा. प्रतिनिधी

कोल्हापूर : राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंतीच्या पूर्वसंध्येला शिवाजी विद्यापीठाच्यावतीने प्रकाशित केलेला 'गाथा आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची' ग्रंथाच्या प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. हा ग्रंथ देशाच्या आत्म्याशी संवाद साधणारा ग्रंथ असुन हा ग्रंथ म्हणजे भावी पिढीच्या चारित्र्यनिर्मितीचा दीपस्तंभ ठरेल, असा विश्वासही

- युवा पिढीच्या चारित्र्यनिर्मितीचा दीपस्तंभ ठरणारा ग्रंथ

त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू तथा वारणा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. अरुण भोसले, गोवा मुक्ती संग्रामातील ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक वसंतराव माने प्रमुख उपस्थित होते. इतिहास अधिविभाग, जनसंपर्क कक्ष, कला व साहित्य मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम संपन्न झाला. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त शिवाजी विद्यापीठाने आपल्या 'शिववाणी" युट्यूब वाहिनीवरुन 'गाथा स्वातंत्र्यसैनिकांची' ही दैनंदिन मालिका वर्षभर चालविली. डॉ. अविनाश पाटील व डॉ. दत्तात्रय मचाले यांनी या ग्रंथाचे संपादन केले आहे.

डॉ. साळुंखे म्हणाले, इतिहासाचे रोमँटीकरण न करता तो वास्तववादी असणे आवश्यक आहे. कारण इतिहास हा भविष्याला दिशा देणारा स्रोत आहे. आजच्या जेन-झीच्या काळात माहितीचा वेग वाढला असला, तरी मूल्यशिक्षणाचे महत्त्व त्याहून अधिक वाढले आहे. स्पर्धा, पैशाच्या निकषावर होणारे मूल्यमापन, सोशल मीडियाचा वाढता प्रभाव, कुटुंबातील कमी होत चाललेला संवाद आणि मनोरंजनाला मिळणारे प्राधान्य यामुळे मूल्यशिक्षण जीवनशैलीचा भाग बनविण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. अशा परिस्थितीत शिक्षकांची भूमिका अधिक महत्वाची ठरते.

एआय माहिती देऊ शकते; मात्र प्रेरणा देण्याचे आणि विद्यार्थ्यांचे चारित्र्य घडविण्याचे काम शिक्षकांनाच करावे लागेल. स्वातंत्र्यसैनिकांचे ऋण कधीही विसरणार नाही, अशी भूमिका घेऊन युवा पिढीने पुढील वाटचाल करावी, असे आवाहन डॉ. साळुंखे यांनी केले.

यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. अरुण भोसले म्हणाले 'गाथा आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची' या ग्रंथाच्या माध्यमातून अशाच ज्ञात-अज्ञात, नायक ठरलेल्या सामान्य स्वातंत्र्यसैनिकांच्या संघर्षाचे दस्तावेजीकरण झाले आहे. सामान्य माणूस हाच स्वातंत्र्यलढ्याचा खरा नायक होता, ही जाणीव पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या प्रकल्पातून झाले आहे.

इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. या उपक्रमाचे समन्वयक डॉ. धीरज शिंदे, डॉ. भरतभूषण माळी, डॉ. अजितकुमार जाधव, प्रा. विलास पवार, चित्रकार राहुल रेपे, डॉ. आलोक जत्राटकर, निवेदक डॉ. सुस्मिता खुटाळे व स्वातंत्र्यसैनिकांच्या तिन्ही जिल्ह्यातील नोंदलेखकांचा ग्रंथभेट देऊन गौरव करण्यात आला. यावेळी डॉ. इस्माइल पठाण, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. भारती पाटील, डॉ. नीलांबरी जगताप, डी. जी. भास्कर आदी उपस्थित होते.

### देशाच्या स्वातंत्र्यामागे त्याग, समर्पन व बलिदान

देशाला मिळालेले स्वातंत्र्य सहज, सोपे किंवा स्वस्तात मिळालेले नाही; त्यामागे असंख्य स्वातंत्र्यसैनिकांचे त्याग, समर्पण आणि बलिदान आहे, याची जाणीव नव्या पिढीला करून देणे आवश्यक आहे. आजच्या पिढीला स्वातंत्र्य हा सहज मिळालेला अधिकार वाटू शकतो; मात्र त्यासाठी सामान्य माणसांनी सोसलेल्या यातना, केलेला संघर्ष आणि दिलेले बलिदान समजून घेतल्याशिवाय त्याचे खरे मोल जाणवणार नसल्याचे वारणा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी सांगितले.

0 2 OCT 2026

सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हा

# 'गाथा आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची' ग्रंथ भावी पिढ्यांच्या चारित्र्यनिर्मितीचा दीपस्तंभ : डॉ. माणिकराव साळुंखे

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेला 'गाथा आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची' हा ग्रंथ देशाच्या आत्म्याशी संवाद साधणारा तसेच भावी पिढीच्या चारित्र्यनिर्मितीचा दीपस्तंभ ठरणारा आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात आज महात्मा गांधी जयंतीच्या पूर्वसंध्येला 'गाथा आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची' या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. राजर्षी शाहू (सिनेट) सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू तथा वारणा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग, जनसंपर्क कक्ष आणि कला व साहित्य मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. अरुण भोसले, गोवा मुक्ती संग्रामातील ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक वसंतराव माने प्रमुख उपस्थित होते.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त शिवाजी विद्यापीठाने आपल्या 'शिववाणी' युट्यूब वाहिनीवरुन 'गाथा स्वातंत्र्यसैनिकांची' ही दैनंदिन मालिका वर्षभर सलग चालविली. या मालिकेतील स्वातंत्र्यसैनिकांच्या जीवनकार्याचे शब्दांकन करून त्याचे ग्रंथरुपात संपादन करण्यात आले आहे. डॉ. अविनाश पाटील आणि डॉ. दत्तात्रय मचाले यांनी संपादन केले आहे. या ग्रंथाचे प्रकाशन डॉ. साळुंखे यांच्या हस्ते झाले.

डॉ. साळुंखे म्हणाले, स्वातंत्र्य चळवळ ही केवळ राजकीय लढाई नव्हती, तर ती नैतिक मूल्यांची क्रांती होती. सत्य, अहिंसा, स्वराज्य, शिक्षण, संविधान आणि राष्ट्रप्रेम यांसारखी मूल्ये स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्या कृतीतून समाजासमोर ठेवली. त्यामुळे त्यांचा इतिहास नव्या पिढीला केवळ भूतकाळाची माहिती देणारा न राहता वर्तमानातील मूल्यजाणीव आणि भविष्याची दिशा देणारा ठरला पाहिजे. इतिहासाचे रोमँटीकरण न करता तो वास्तववादी असणे आवश्यक आहे; कारण इतिहास हा भूतकाळाचा केवळ संग्रह नसून भविष्याला दिशा देणारा स्रोत आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

ते म्हणाले, आजच्या जेन-झीच्या काळात माहितीचा वेग वाढला असला, तरी मूल्यशिक्षणाचे महत्त्व त्याहून अधिक वाढले आहे. स्पर्धा, पैशाच्या निकषावर होणारे मूल्यमापन, सोशल मीडियाचा वाढता प्रभाव, कुटुंबातील कमी होत चाललेला संवाद आणि मनोरंजनाला मिळणारे प्राधान्य यामुळे मूल्यशिक्षण जीवनशैलीचा भाग बनविण्याचे



आव्हान निर्माण झाले आहे. अशा परिस्थितीत शिक्षकांची भूमिका अधिक महत्त्वाची ठरते. एआय माहिती देऊ शकते; मात्र प्रेरणा देण्याचे आणि विद्यार्थ्यांचे चारित्र्य घडविण्याचे काम शिक्षकांनाच करावे लागेल, असे सांगून डॉ. साळुंखे यांनी अशा ग्रंथांचा विद्यार्थ्यांच्या मूल्यशिक्षणासाठी प्रभावी वापर करण्याचे आवाहन केले. "ज्ञान मिळवू, वेग जोपासू, यश मिळवू; पण मूल्य सोडणार नाही. स्वातंत्र्याचा लाभ घेऊ; पण स्वातंत्र्यसैनिकांचे ऋण कधीही विसरणार नाही," अशी भूमिका घेऊन युवा पिढीने पुढील वाटचाल करावी, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. अरुण भोसले म्हणाले, स्वातंत्र्याचा संघर्ष आणि लढा हा प्रस्थापित किंवा अभिजनांनी नव्हे, तर जीवाची पर्वा न करता लढणाऱ्या सामान्य माणसांनी घडविला आहे. स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात राष्ट्रीय पातळीवरील नेते आणि सशस्त्र क्रांतिकारकांच्या कार्याला प्रारंभी अधिक महत्त्व मिळाले; मात्र गावागावांत, खेड्यापाड्यांत चेहराविहीन, आवाजहीन असंख्य सामान्य माणसांनी केलेला त्याग आणि दिलेले बलिदान इतिहासाच्या मुख्य प्रवाहात पुरेसे नोंदले गेले नाही. 'गाथा आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची' या ग्रंथाच्या माध्यमातून अशाच ज्ञात-अज्ञात, न-नायक ठरलेल्या सामान्य स्वातंत्र्यसैनिकांच्या संघर्षांचे दस्तावेजीकरण झाले असून त्यांच्या मनोगतांना शब्द आणि त्यांच्या कार्याला इतिहासात स्थान मिळाले आहे. दक्षिण महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांतील ३६६ ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांच्या शौर्यगाथा संशोधन, मुलाखती आणि उपलब्ध दस्तऐवजांच्या आधारे नोंदविणारा हा ग्रंथ मातीतील या न-नायकांच्या असामान्य पराक्रमाला दिलेली मानवंदना आहे. सामान्य माणूस हाच स्वातंत्र्यलढ्याचा खरा नायक होता, ही जाणीव पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या प्रकल्पातून झाले आहे, असे कौतुकोद्गार त्यांनी काढले.

देशाला मिळालेले स्वातंत्र्य सहज, सोपे किंवा स्वस्तात मिळालेले नाही; त्यामागे असंख्य स्वातंत्र्यसैनिकांचे त्याग, समर्पण आणि बलिदान आहे, याची जाणीव नव्या पिढीला करून देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन वारणा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी अध्यक्षीय मनोगतात केले. ते म्हणाले, आजच्या पिढीला स्वातंत्र्य हा सहज मिळालेला अधिकार वाटू शकतो; मात्र त्यासाठी सामान्य माणसांनी सोसलेल्या यातना, केलेला संघर्ष आणि दिलेले बलिदान समजून घेतल्याशिवाय त्याचे खरे मोल जाणवणार नाही. 'गाथा आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची' हा ग्रंथ या अर्थाने महत्त्वाचा असून, स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान नव्या पिढीसमोर जिवंतपणे मांडत त्यांच्याप्रती कृतज्ञतेची आणि जबाबदारीची भावना निर्माण करण्याचे काम तो करेल. स्वातंत्र्याचा हा वारसा केवळ स्मरणात न राहता तो पुढील पिढ्यांच्या जाणिवेचा आणि कृतीचा भाग व्हावा, यासाठी या ग्रंथाचे योगदान महत्त्वपूर्ण ठरेल, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी या उपक्रमाचे कोल्हापूर जिल्हा समन्वयक डॉ. धीरज शिंदे, सांगली जिल्हा समन्वयक डॉ. भरतभूषण माळी, सातारा जिल्हा समन्वयक डॉ. अजितकुमार जाधव, तसेच, प्राचार्य विलास पवार, चित्रकार राहुल रेपे, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, निवेदक डॉ. सुस्मिता खुटाळे आणि स्वातंत्र्यसैनिकांच्या तिन्ही जिल्ह्यातील नोंदलेखकांचा मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र, पुष्प व ग्रंथभेट देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

कार्यक्रमास डॉ. इस्माइल पठाण, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. भारती पाटील, डॉ. नीलांबरी जगताप, डी.जी. भास्कर यांच्यासह विविध अधिविभागांसह महाविद्यालयांतील शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि स्वातंत्र्यसैनिकांचे कुटुंबिय आणि नातेवाईक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 OCT 2026
लोकसिंह

# गाथा आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची ग्रंथाचे प्रकाशन

कोल्हापूर(प्रतिनिधी):- शिवाजी विद्यापीठात महात्मा गांधी जयंतीच्या पूर्वसंध्येला गाथा आपल्या स्वातंत्र्य सैनिकांची या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ आयोजित करण्यात आला आहे. गुरुवार, दि. १ ऑक्टोबर २०२६ रोजी सायं काळी ४ वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू (सिनेट) सभा गृहात कार्यक्रम होईल. विद्या पीठाचा इतिहास अधिविभाग, जनसंपर्क कक्ष आणि कला व साहित्य मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम आयोजित केला आहे.

विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते आणि वारणानगर येथील वारणा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. दिगंबर शिर्के यांच्या विशेष उपस्थितीत कार्यक्रम होईल. कुलगुरू प्रा. राजनिश कामत अध्यक्षस्थानी असतील.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त शिवाजी विद्यापीठाने आपल्या शिववाणी युटयूब वाहिनीवरुन गाथा स्वातंत्र्यसैनिकांची ही दैनंदिन मालिका वर्षभर सलग चाल विली. या मालिकेतील स्वातंत्र्य सैनिकांच्या जीवनकार्याचे शब्दांकन करून त्याचे ग्रंथरुपात संपादन करण्यात आले आहे. डॉ. अविनाश पाटील आणि डॉ. दत्तात्रय मचाले यांनी संपादन केले आहे. नव्या पिढीला स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास आणि स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान समजून घेण्यासाठी हा ग्रंथ महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

कार्यक्रमास प्र-कुलगुरू प्रा. ज्योती जाधव, ज्येष्ठ इतिहास संशोधक प्रा. अरुण भोसले, इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अविनाश पाटील तसेच कुल सचिव डॉ. विलास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. इतिहास, स्वातंत्र्य चळवळ विष यांत रस असलेल्या नागरिकांनी, विद्यार्थी, संशोधक आणि विद्या पीठातील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

02 OCT 2026
सकाळ

# विद्यापीठांमध्ये परस्पर सहकार्य आवश्यक

## राज्यपाल : कुलगुरूंची 'भविष्यवेधी तंत्रज्ञान' गटाची बैठक



मुंबई : लोकभवनात राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते 'जॉय ऑफ पायथॉन : फाउंडेशन्स ऑफ डेटा सायन्स' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी शेजारी जॉन रोज, आर. के. कामत, सुनील भिरूड, अरविंद किवळेकर आदी.

कोल्हापूर, ता. १ : विकसित भारताचे स्वप्न साकारण्यासाठी विद्यापीठांमध्ये परस्पर सहकार्य आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सायन्सच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य आणि रोजगार अधिक सर्वसमावेशक करण्यावर भर देण्याचे आवाहन राज्यपाल तथा कुलपती जिष्णू देव वर्मा यांनी केले.

मुंबईतील लोकभवनात कुलगुरूंच्या 'भविष्यवेधी तंत्रज्ञान' गटाच्या बैठकीत ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. राज्यपाल वर्मा यांच्या हस्ते प्रा. जॉन रोज यांनी लिहिलेल्या 'जॉय ऑफ पायथॉन : फाउंडेशन्स ऑफ डेटा सायन्स' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी भविष्यवेधी तंत्रज्ञान गटाचे प्रमुख शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत, सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुनील भिरूड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे प्रा. अरविंद किवळेकर उपस्थित होते.

02 OCT 2026

जनसंपर्क कक्ष
तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ यांचे प्रतिपादन

# गांधीजींची शिक्षणपद्धती आजच्या व्यवस्थेला दिशादर्शक

त. भा. प्रतिनिधी

**कोल्हापूर :** महात्मा गांधींची शिक्षणपद्धती आजच्या शिक्षण व्यवस्थेला दिशा देणारी असुन शिक्षणासाठी पर्यायी व्यवस्था ठरू शकते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्यावतीने राज्यशास्त्र विषयांतर्गत महात्मा गांधी जयंतीनिमित्त आयोजित ऑनलाईन परिसंवादात ते बोलत होते. 'महात्मा गांधीजींचे शिक्षणविषयक विचार आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण" या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्राच्या संचालक डॉ. प्रतिमा पाटणकर होत्या. यावेळी उपकुलसचिव विनय शिंदे, सहायक कुलसचिव दिलीप मोहाडीकर, सहायक प्राध्यापक डॉ. सचिन भोसले आणि डॉ. मुफिद मुजावर उपस्थित होते.

बेडकिहाळ म्हणाले की, गांधीजींनी केवळ शिकवण्याला महत्त्व दिले नाही. शिकता शिकता नवीन कौशल्ये आत्मसात केली पाहिजेत हा विचार त्यांनी श्रमाशी जोडला. जीवनाला उपयुक्त असणारे शिक्षण रूजविण्याचा विचार गांधीजींनी मांडला. शिक्षणाच्या प्रवाहात हस्तकौशल्याला त्यांनी विशेष महत्त्व दिले. अमेरिका, ब्रिटन आणि फ्रान्समधील काही विचारवंतांनाही गांधीजींची शिक्षणपद्धती महत्त्वाची वाटत होती, असे त्यांनी नमूद केले.

प्रा. डॉ. भारती पाटील म्हणाल्या, महात्मा गांधीजीच्या नई तालीमचे परिपूर्ण तत्वज्ञान समजून घेणे महत्वाचे आहे. नई तालीमच्या परिपूर्ण व्यवस्थेचे प्रयोग महात्मा गांधींनी दक्षिण आफ्रिकेत सुरू केले. या शिक्षणपद्धतीमागे स्वराज्याचा लढा आणि नवभारताचे स्वप्न होते. स्वराज्य भारतामध्ये शिक्षणपद्धती कशी असावी, याचे चित्रण गांधीजींनी नई तालीमच्या माध्यमातून केले. समन्वयक डॉ. कृष्णा पाटील यांनी प्रास्ताविक, डॉ. सूर्यकांत गायकवाड यांनी परिचय करून दिला. सूत्रसंचालन डॉ. नगीना माळी यांनी केले. आभार सहायक प्राध्यापक डॉ. नितीन रणदिवे यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 OCT 2026
सकाळ

# महात्मा गांधींनी जीवनोपयोगी शिक्षणाचा विचार मांडला

## किशोर बेडकिहाळ : दूरशिक्षण केंद्रात परिसंवाद

कोल्हापूर, ता. १ : महात्मा गांधी यांनी केवळ शिकवण्याला महत्त्व दिले नाही. 'शिकता शिकता नवीन कौशल्ये आत्मसात केली पाहिजेत' हा विचार त्यांनी श्रमाशी जोडला. जीवनाला उपयुक्त असणारे शिक्षण रुजविण्याचा विचार त्यांनी मांडला, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे राज्यशास्त्र विषयांतर्गत 'महात्मा गांधीजींचे शिक्षणविषयक विचार आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' या विषयावर विशेष ऑनलाईन परिसंवादात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी केंद्राच्या संचालक डॉ. प्रतिभा पाटणकर होत्या. महात्मा गांधीजींच्या नई तालीमचे परिपूर्ण तत्त्वज्ञान समजून घेणे महत्त्वाचे आहे. या शिक्षणपद्धतीमागे स्वराज्याचा लढा आणि नवभारताचे स्वप्न होते. तंत्रज्ञान आणि माणूस यांच्यातील द्वंद्वातून बाहेर पडण्यासाठी नई तालीम हा पर्याय असू शकतो, अशी भूमिका गांधीजींनी मांडली होती, असे प्रा. डॉ. भारती पाटील यांनी सांगितले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये गांधीजींच्या शिक्षणविषयक विचारांचे प्रतिबिंब दिसून येते, असे डॉ. पाटणकर यांनी सांगितले. कृष्णा पाटील यांनी प्रास्ताविक केले. सूर्यकांत गायकवाड यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. उपकुलसचिव विनय शिंदे, सहायक कुलसचिव दिलीप मोहाडीकर, सचिन भोसले, मुफिद मुजावर उपस्थित होते. नगीना माळी यांनी सूत्रसंचालन केले. नितीन रणदिवे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 OCT 2026

सिंधुदुर्ग समाचार

# 'कृत्रिम बुद्धिमत्ते' बाबत विद्यापीठात एकदिवसीय कार्यशाळा

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठाचा आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, कौशल्य विकास विभाग आणि इझी लर्निंग इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षणशास्त्र सभागृहात 'कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा आज उत्साहात झाली.

कार्यशाळेत सध्याच्या डिजिटल युगात आणि शिक्षण क्षेत्रात आर्टिफिशिअल इंटेलिजन्सचे महत्त्व, त्याची विविध अंगे व दैनंदिन जीवनातील व्यावहारिक उपयोग याविषयी तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. या नवतंत्रज्ञानाचा प्रभावी वापर कसा करावा, याची इझी लर्निंग इन्स्टिट्यूटचे नीलेश जैन यांनी प्रात्यक्षिकांसह माहिती दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार होते. प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्रमुख डॉ. केदार मारूलकर, कौशल्य विकास अधिकारी ईश्वर पुजारी उपस्थित होते.

यशोधन बोकील यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. रवींद्र खैरे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यशाळेला विविध अभ्यासक्रमाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

0 2 OCT 2026
तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लक्षवेधी

एकल वापराच्या प्लास्टिकवर पूर्ण बंदी : सर्व विभाग, कॅन्टीन, मेस, स्टॉल्सना कुलसचिवांचे निर्देश

# शिवाजी विद्यापीठात प्लास्टिकला 'नो एंट्री'

**प्रतिनिधी**, कोल्हापूर

पर्यावरण संवर्धनासाठी शिवाजी विद्यापीठाने महत्त्वाचे पाऊल उचलत विद्यापीठ परिसरात एकल वापराच्या प्लास्टिक (सिंगल यूज प्लास्टिक) वस्तूंच्या वापरावर पूर्णपणे बंदी लागू केली आहे. याबाबतचे परिपत्रक विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी काढले असून, विद्यापीठातील सर्व विभाग, अधिविभाग, कार्यालये, मेस, उपहारगृहे, स्नॅक्स स्पॉट, खाद्य केंद्रे, स्टॉल्स, कंत्राटदार, सेवा पुरवठादार तसेच विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना त्याचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.



याची अंमलबजावणी गुरूवारपासून सुरू करण्यात आली आहे. प्लास्टिक कचऱ्यामुळे पर्यावरणावर होणारा विपरित परिणाम लक्षात घेऊन केंद्र व महाराष्ट्र शासनाने प्लास्टिकच्या विविध वस्तूंवर निर्बंध लागू केले आहेत. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार वस्तूंच्या उत्पादन, आयात, साठवणूक, वितरण, विक्री आणि वापरावर १ जुलै २०२२ पासून बंदी आहे. याच पार्श्वभूमीवर, विद्यापीठ परिसर प्लास्टिकमुक्त, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक ठेवण्यासाठी प्रशासनाने हे निर्देश दिले आहेत. याची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे परिपत्रकात म्हटले आहे. त्यानुसार शिवाजी विद्यापीठात प्लास्टिकचा वापर झाल्याचे आढळल्यास तत्काळ कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.



विद्यापीठातील कॅन्टीन, स्नॅक्स स्पॉट, मेस, अतिथीगृह व खाद्य केंद्रांमध्ये प्लास्टिकच्या प्लेट, कप, ग्लास, चमचे, वाट्या, स्ट्रॉ, स्टिरर, कंटेनर आदी प्रतिबंधित वस्तूंचा वापर करता येणार नाही. त्याऐवजी स्टील, काच किंवा पुनर्वापर करता येणाऱ्या वस्तूंचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## विद्यार्थ्यांचीही जबाबदारी

**विद्यापीठ परिसर हा केवळ शिक्षणाचा केंद्रबिंदू नसून पर्यावरणपूरक जीवनशैलीचा आदर्श ठरू शकतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी स्वत?पासून प्लास्टिकमुक्तीची सुरुवात करावी. 'मी प्लास्टिक वापरणार नाही, इतरांनाही वापरू देणार नाही' हा संकल्प केल्यास विद्यापीठ परिसर स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक ठेवण्यास मोठी मदत होणार आहे.**

**नियमभंग झाल्यास कारवाई**

विद्यापीठ प्रशासनाकडून उपाहारगृहे, स्नॅक्स स्पॉट, मेस व खाद्य केंद्रांची वेळोवेळी पाहणी करण्यात येणार आहे. प्रतिबंधित प्लास्टिक वस्तूंचा वापर आढळल्यास लागू शासन नियम तसेच संबंधित करारातील तरतुदींनुसार आवश्यक कार्यवाही केली जाणार आहे. विद्यापीठ प्रशासनाने सर्व संबंधितांना प्रतिबंधित प्लास्टिक वस्तूंची खरेदी, साठवणूक, विक्री, वितरण आणि वापर टाळण्याचे आवाहन केले आहे.



**विद्यापीठात खालील वस्तूंना 'नो एंट्री'**

- प्लास्टिक काड्यांचे इअरबड्स
- फुगे, कँडी, आईस्क्रीमसाठी प्लास्टिकच्या काड्या
- प्लास्टिक झेंडे
- सजावटीसाठी पॉलिस्टायरीन/थर्मोकोल
- प्लास्टिक प्लेट, कप, ग्लास, चमचे, काटे, सुरी, ट्रे
- प्लास्टिक स्ट्रॉ व स्टिरर
- प्रतिबंधित प्लास्टिक पॅकिंग, रॅपिंग फिल्म
- १०० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीचे प्लास्टिक/झ्र्प बॅनर
- शासनाने वेळोवेळी प्रतिबंधित केलेल्या इतर सिंगल यूज प्लास्टिक वस्तू

0 2 OCT 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ परिसर 'प्लास्टिकमुक्त'

## सिंगल यूज प्लास्टिक बंदीचा कडक बडगा



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पर्यावरणपूरक आणि स्वच्छ वातावरण राखण्यांच्या उद्देशाने शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने विद्यापीठ परिसर 'एकल वापराचे प्लास्टिक' (सिंगल यूज प्लास्टिक) मुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या स्वाक्षरीने परिपत्रक जारी केले आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विद्यापीठाच्या सर्व विभागांतर्गत येणाऱ्या कार्यालयांमध्ये मेस, उपाहारगृह, खाद्यकेंद्रे, तसेच विविध कार्यक्रमांतर्गत प्रतिबंधित प्लास्टिकचे उत्पादन, साठवणूक, विक्री आणि वापरावर सक्त बंदी घालण्यात आली असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक दंडात्मक व प्रशासकीय कारवाई करण्यात येणार आहे.

केंद्र आणि राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाच्या नियमावलीनुसार, विद्यापीठ परिसर प्लास्टिकमुक्त ठेवण्यासाठी प्रशासनाने हा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या अंतर्गत १०० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीचे प्लास्टिक बॅनर्स व कॅरी बॅगच्या वापरावर पूर्ण बंदी असणार आहे. तसेच उपाहारगृहे आणि मेसचालकांनी स्टील, काच किंवा पुनर्वापर करता येणाऱ्या पर्यायी वस्तूंचा वापर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. विद्यापीठातील सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी, अधिकारी, कर्मचारी, तसेच कंत्राटदार आणि कँटिनचालकांनी या नियमांची कठोर अंमलबजावणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 2 OCT 2026
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ परिसरात एकल वापराच्या प्लास्टिकवर बंदी!

## • कुलसचिवांकडून परिपत्रक जारी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने विद्यापीठ परिसरात एकल वापराच्या प्लास्टिकच्या वस्तूंच्या वापरावर निर्बंध लागू केले आहेत.

प्रतिबंधित वस्तूंमध्ये प्लास्टिकचे इअर बडस्, फुगे व सजावटीसाठी वापरले जाणारे प्लास्टिकचे काड्या, प्लास्टिकचे झेंडे, पॉलिस्टायरीन, थर्माकोल, प्लास्टिक प्लेट, कप, ग्लास, चमचे, काटे, सुरी, स्ट्रॉ, स्टिरर्स तसेच १०० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक किंवा पीव्हीसी बॅनर्सचा समावेश आहे. तसेच, ६० जीएसएमपेक्षा कमी वजनाच्या नॉन-वोव्हन प्लास्टिक कॅरी बॅगवरही निर्बंध घालण्यात आले आहेत.

0 2 OCT 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उत्तम आवाजासाठी योग, प्राणायम आवश्यक

- भरत दैनी यांचे प्रतिपादन
- मास कम्युनिकेशन विभागात व्हाईस ॲक्टींग कार्यशाळा

प्रतिनिधी, कोल्हापूर

आवाजाची सुरुवात श्वसनापासून होत असते. आवाज हा व्यक्तिमत्त्वाचा आरसा असून त्याचा पोत उत्तम असायला हवा. यासाठी नियमित योग आणि प्राणायाम आवश्यक असल्याचे मत व्हॉईस आर्टिस्ट, लेखक भरत दैनी यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठच्या बी.ए. फिल्म मेकिंग विभाग आणि विंडो फिल्म प्रोडक्शन यांच्या संयुक्त विद्यमाने मास कम्युनिकेशन विभागात आयोजित व्हॉईस ॲक्टिंग कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते.



कोल्हापूर : कार्यशाळेत बोलताना भरत दैनी.

दैनी म्हणाले, आवाज हे फक्त संभाषणाचे माध्यम नाही, तर तो विचार, भावना आणि अनुभव व्यक्त करण्याचे प्रभावी साधन आहे. या क्षेत्रात व्यवसायाच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. त्यासाठी विद्यार्थ्यांनी सातत्याने प्रयत्न केले पाहिजेत; तरच या क्षेत्रात टिकून राहता येईल.

मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. अभिनव गुरव व खुशिया त्र्यंबके यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. सायली गणेशकर यांनी सूत्रसंचालन केले. रितेश कोलभ यांनी आभार मानले.

यावेळी विंडो फिल्म प्रोडक्शनचे संचालक चंद्रशेखर गुरव, चित्रपट समीक्षक डॉ. अनमोल कोठडिया, हिंदी विभागाच्या प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी, दादू संकपाळ, डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील, अनुप जत्राटकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 2 OCT 2026
तरुण भारत

# शहाजी महाविद्यालयात उद्या राष्ट्रीय परिसंवाद

प्रतिनिधी, कोल्हापूर

येथील श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात शनिवारी, ३ रोजी ज्येष्ठ इतिहास संशोधक, इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार : इतिहास लेखन, संशोधन आणि योगदान या विषयावर राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन केले आहे. परिसंवादाचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते आणि श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, राहुल पाटील, राजेश पाटील, इंद्रजीत बोंद्रे, वसुधा जयसिंगराव पवार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

परिसंवादाच्या पहिल्या सत्रामध्ये डॉ. अवनीश पाटील यांचे आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहास लेखनातील जयसिंगराव पवार यांचे योगदान यावर आणि प्राचार्य डॉ. आर के. शानेदिवाण यांचे पंचगंगेच्या तीरावरून यावर व्याख्यान होणार आहे.

अध्यक्षस्थान भरतभूषण माळी भूषवणार आहेत. दुसऱ्या सत्रामध्ये डॉ. सुरेश शिखरे यांचे डॉ. जयसिंगराव पवार यांची इतिहास लेखन पद्धती या विषयावर तर डॉ. मंजुश्री पवार यांचे इतिहास संशोधक : माझे वडील या विषयावर व्याख्यान होणार आहे. या सत्राचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. इस्माईल पठाण भूषवणार आहेत. प्राचार्य डॉ. जे. के. पवार यांच्या उपस्थितीत परिसंबादाचा समारोप होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 2 OCT 2026

लोकसत्ता

# डॉ. जयसिंगराव पवार यांच्या संशोधनावर उद्या राष्ट्रीय परिसंवाद

**कोल्हापूर :** ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार : इतिहासलेखन, संशोधन आणि योगदान या विषयावर येथे उद्या, शनिवारी राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन केले आहे. त्याचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते आणि श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मानसिंग बोंद्रे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात होणाऱ्या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, वसुधा जयसिंगराव पवार यांची प्रमुख उपस्थिती असेल. प्रा. डॉ. अवनीश पाटील (आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहास लेखनातील जयसिंगराव पवार यांचे योगदान), प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण (पंचगंगेच्या तीरावरून, काळाचा पट मांडणारा दस्तऐवज) यांचे व्याख्यान होणार असून, अध्यक्षस्थानी भरतभूषण माळी असतील. ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. जे. के. पवार यांच्या उपस्थितीत समारोप होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 OCT 2026
पुढारी

# शहाजी महाविद्यालयात उद्या राष्ट्रीय परिसंवाद

**कोल्हापूर:** शहाजी छत्रपती महाविद्यालयातर्फे 'इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार : इतिहालेखन, संशोधन आणि योगदान' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन केले आहे. शहाजी महाविद्यालयाच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात शनिवारी (दि. ३) सकाळी १० वाजता हा परिसंवाद होणार आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. रजनीश कामत यांच्या हस्ते परिसंवादाचे उद्घाटन होणार असून, शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे अध्यक्षस्थानी राहणार आहेत.परिसंवादाच्या पहिल्या सत्रात प्रा. डॉ. अवनीश पाटील हे 'आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहास लेखनातील डॉ. जयसिंगराव पवार यांचे योगदान', तर प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण 'पंचगंगेच्या तीरावरून काळाचा पट मांडणारा दस्तऐवज' या विषयावर मार्गदर्शन करतील. दुसऱ्या सत्रात डॉ. सुरेश शिखरे 'डॉ. जयसिंगराव पवार यांची इतिहासलेखन पद्धती व विशेष संदर्भ सेनापती संताजी घोरपडे यांचे चरित्र', तर डॉ. मंजुश्री पवार 'इतिहास संशोधक माझे वडील' या विषयावर विचार मांडणार आहेत.यावेळी डॉ. डी. आर मोरे, राहुल पाटील,नगरसेवक इंद्रजित बोंद्रे, वसुधा पवार आदींसह इतिहास प्रेमींची उपस्थिती असणार आहे. .

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 OCT 2026

तरुण भारत

# शहाजी लॉ कॉलेजचे युवा महोत्सवात यश

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ४६व्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात शहाजी लॉ कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

एकपात्री अभिनय, मराठी वक्तृत्व आणि इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक मिळविला. हिंदी वक्तृत्व स्पर्धेतही प्रथम क्रमांक पटकावला. वादविवाद स्पर्धेत द्वितीय, प्रश्नमंजुषा व भारतीय समूहगीत स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळविला. पथनाट्य स्पर्धेत चौथा, तर एकांकिका स्पर्धेत पाचवा क्रमांक मिळाला. विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांची युवा महोत्सव स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विद्यार्थ्यांना समन्वयक प्रा. सुहास पत्की, सहायक प्रा. श्रुती यज्ञोपवीत, सहायक प्रा. अनिरुद्ध बुले यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 OCT 2026
सकाळ

# गारगोटीत उद्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उद्‍घाटन

**गारगोटी :** येथील शाहू वाचनालय संचलित शाहू अकॅडमीतर्फे सुरू केलेल्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र व अभ्यासिका यांचा उद्‍घाटन समारंभ शनिवारी (ता. ३) दुपारी २.३० वाजता डॉ. जे. पी. नाईक स्मृती सभागृह येथे होणार आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांच्या हस्ते केंद्राचे उद्‍घाटन होणार असून, माजी आमदार बजरंग देसाई अध्यक्षस्थानी असतील. 'नाबार्ड'चे माजी अध्यक्ष डॉ. यशवंत थोरात प्रमुख उपस्थित राहणार आहेत. या केंद्रामुळे गारगोटीसह भुदरगड परिसरातील स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी सुविधा उपलब्ध होणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन निमंत्रक राहुल देसाई यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 2 OCT 2026
पुण्यनगरी

# हिंदी भाषेने माणसे जोडली : कुलकर्णी

**चंदगड : प्रतिनिधी**

हिंदी भाषेने भारतातील विविध प्रांत, संस्कृती आणि माणसांना जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले असून, भारतीय संस्कृतीची समृद्ध परंपरा देशाच्या सीमा ओलांडून जगभर पोहोचविण्यात हिंदी साहित्याचे मोठे योगदान आहे, असे प्रतिपादन प्रा. एस. व्ही. कुलकर्णी यांनी केले.

येथील र. भा. माडखोलकर महाविद्यालय, चंदगड येथील हिंदी विभागाच्या वतीने आयोजित हिंदी दिन सप्ताह समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा. व्ही. के. गावडे होते.

यावेळी 'साहित्य दर्पण' या भित्तीपत्रकाचे अनावरण करण्यात आले. हिंदी दिन सप्ताहाच्या अनुषंगाने विविध साहित्यिक व भाषाविषयंक स्पर्धाही उत्साहात झाल्या. प्रा. व्ही. के. गावडे यांनी उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी डॉ. एस. डी. गावडे, डॉ. एन. के. पाटील, डॉ. जी. वाय. कांबळे, डॉ. एस. डी. गोरल, डॉ. मोहन घोळसे आदी उपस्थित होते. डॉ. एस. एन. पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. आर. ए. कमलाकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 2 OCT 2026

पुढारी

# विवेकानंद महाविद्यालयात 'आविष्कार संशोधन' स्पर्धा

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालय येथे आविष्कार समिती व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयस्तरीय 'आविष्कार संशोधन' स्पर्धा उत्साहात झाली. स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना डॉ. हुजरे यांनी विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची वृत्ती विकसित होणे आवश्यक असून, त्यांच्या संशोधनाचा समाजाला उपयोग झाला पाहिजे, असे सांगितले. स्पर्धेत पदवी, पदव्युत्तर व पदव्युत्तर पश्चात विद्यार्थ्यांनी नावीन्यपूर्ण कल्पना पोस्टर व प्रात्यक्षिक मॉडेलच्या माध्यमातून सादर केल्या. मानव्यविद्या, भाषा व ललित कला, वाणिज्य, व्यवस्थापन व कायदा, शुद्ध विज्ञान, कृषी व पशुसंवर्धन, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान तसेच औषधनिर्माण व वैद्यकशास्त्र अशा सहा गटांत स्पर्धा घेण्यात आली. संयोजिका डॉ. अस्मिता तपासे-शिंदे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. अमेय पाटील यांनी आभार मानले.